ePaper

आता ओबीसींची आंदोलनाची हाक; मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखले देण्यास विरोध




| वर्ष - 7 | अंक - 181 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- एकच वादा मॅक्सवेल दादा!
- त्रिधा अडकणार लग्नबंधनात!
- बिहारमध्ये ६५ टक्के आरक्षण!
- ओबीसींचे आमच्याविरोधात षडयंत्र!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 8 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# हवा प्रदूषणाचा ‘अलर्ट’!

## » आयुक्त शेखर सिंह : अधिकाऱ्यांना दिल्या उपाययोजनेच्या सूचना

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हवेच्या ढासळत्या गुणवत्तेवर चिंता व्यक्त करत प्रदुषण रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने शासनाला निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रदुषण रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने कराव्यात, असे निर्देश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. बांधकाम साहित्याची वाहतूक करताना आच्छादन करून वाहनातून ने आण करावी, अशी सूचनाही त्यांनी केली.**



महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामध्ये आज या विषयावर आयुक्त सिंह यांच्या अध्यक्षतेखाली महत्वपुर्ण बैठक पार पडली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, शहर अभियंता मकरंद निकम, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, डॉ. ज्ञानदेव जुंधारे, मनोज सेटिया, आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात,

आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अण्णा बोदडे, उमेश ढाकणे, राजेश आगळे, सिताराम बहुरे, अंकुश जाधव, कार्यकारी अभियंता देवण्णा गट्टूवार, विजयकुमार काळे, बापू गायकवाड, राजेश शिंदे, अशोक जावळे, विजय ओहोळ, अनिल शिंदे, देवेंद्र बोरावके, राजेंद्र निंबाळकर, प्रेरणा सिनकर, जाहीरा शेख यांच्यासह पर्यावरण, स्थापत्य, बांधकाम परवानगी, बीआरटीएस, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, वैद्यकीय, माहिती व जनसंपर्क आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



### मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश...

हवेतील वाढत्या प्रदुषणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने स्वत:हून दाखल केलेल्या जनहित याचिकेवर नुकतीच सुनावणी झाली. वाढत्या वायू प्रदुषणाला रोखण्यासाठी शासनाने तसेच महानगरपालिकांनी दखल घेऊन या गंभीर विषयावर तातडीने उपाययोजना कराव्यात तसेच केलेल्या कार्यवाहीबद्दल अहवाल सादर करावा, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले. याबाबत शासनाने गंभीर पाऊल उचलले असून प्रदुषण नियंत्रणाच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. हवेतील प्रदुषण रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून देखील विविध निर्देश आणि मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. विविध शहरांची प्रदुषणाच्या पातळीची आकडेवारी विचारात घेऊन उपाययोजनांची तीव्रता वाढविण्याच्या सूचना देखील यामध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

### महापालिका काढणार स्वतंत्र आदेश...

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध माध्यमातून होणारे वायुप्रदुषणरोखण्यासाठी संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. सार्वजनिक स्थानांमध्ये अस्वच्छता करणे, कचरा जाळणे अशा विविध कारणांसाठी संबंधित व्यक्ती अथवा आस्थापनांवर महापालिकेच्या वतीने कडक कारवाई केली जाणार आहे. यासाठी विशेष पथके तयार करून नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी क्षेत्रीय अधिकारी तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिले. बांधकाम साहित्याची वाहतूक करताना आच्छादन करून वाहनातून ने आण करावी, वाहनाच्या टायरला चिकटलेली माती मुख्य रस्त्यावर आल्याने धुलीकणांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे संबंधित वाहनाच्या टायरवर जलफवारणी (स्प्रिंकलर) करूनच अशी वाहने मुख्य रस्त्यावर चालवावीत, बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी योग्य प्रकारचे कापडी आच्छादन आणि बॅरिकेड्स लावाव्यात आदींबाबत स्वतंत्र आदेश महापालिकेच्या वतीने जारी केले जाणार आहेत.

> “ नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरूद्ध दंडात्मक कारवाई देखील केली जाणार आहे. याबाबत जारी करण्यात आलेल्या विविध मार्गदर्शक सूचना आणि आदेशांची माहिती संबंधितांपर्यंत पोहोचविण्यासाठी बैठका घेण्यात येणार आहेत. या कामकाजासाठी संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाणार असून कारवाई करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा कामात हलगर्जीपणा केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.
>
> .– **शेखर सिंह**, आयुक्त

# विद्यापीठाच्या परिसरात जमावबंदी!

## » हाणामारी, मोर्चांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा आदेश

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**गेल्या काही दिवसांत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थी संघटनांमध्ये हाणामारीच्या घटना घडल्यामुळे पुणे सहपोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी विद्यापीठाच्या आवारात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. त्यानुसार ७ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत जमावबंदी लागू करण्याचा आदेश देण्यात आला असून, आदेशाचा भंग करणाऱ्यांवर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.**




विद्यार्थी संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेली हाणामारी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर लिहिल्याची तक्रार, राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून विद्यार्थ्यांना मारहाण अशा घटनांमुळे विद्यापीठात तणावाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी पुणे पोलिसांना पत्र दिले होते. त्यानंतर पुणे सहपोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी विद्यापीठाच्या परिसरात जमावबंदी लागू करण्याचे आदेश दिले. गेल्या काही दिवसांत विद्यापीठाच्या बाहेरील व्यक्ती, संघटना यांनी विद्यापीठाची किंवा पोलिसांची पूर्वपरवानगी न घेता निदर्शने, आंदोलने, मोर्चा आयोजित करून, चिथावणी देणारी भाषणे, घोषणांद्वारे शांततेचा भंग करून शैक्षणिक वातावरण बाधित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या कामात व्यत्यय निर्माण होऊन अनेकदा भांडणे, मारामारी झाल्याचे निदर्शनास येते. या संदर्भात पोलिसांकडे अनेक तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यामुळे विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पूरक असे सौहार्दपूर्ण, शांततामय वातावरणाची आवश्यकता असल्याने विद्यापीठ आणि सभोवतालच्या शंभर मीटर परिसरात निर्बंध घालणे जरुरीचे असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. फौजदारी संहिता प्रक्रिया १९७३च्या कलम १४४ नुसार विद्यापीठ आणि सभोवतालच्या शंभर मीटर परिसरात विद्यार्थ्यांशिवाय इतर व्यक्तींना एकत्र येण्यास, विद्यापीठात प्रवेश करण्यास प्रतिबंध, विद्यापीठ परिसरात दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. या आदेशातून विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, पोलिस अधिकारी, सुरक्षा अधिकारी यांना वगळण्यात आले आहे. विद्यापीठ परिसरात ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यास, विद्यापीठ परिसरात कोणताही आक्षेपार्ह, दोन गटात वाद होईल असा मजकूर लिहिण्यास आणि छापील मजकूर चिकटवण्यास मनाई करण्यात आली आहे. या आदेशाचे भंग केल्यास कलम १८८ नुसार कारवाईचा इशारा आदेशाद्वारे देण्यात आला आहे.

### विद्यापीठात प्रवेश करण्यास प्रतिबंध

» गेल्या काही दिवसांत विद्यापीठाच्या बाहेरील व्यक्ती, संघटना यांनी विद्यापीठाची किंवा पोलिसांची पूर्वपरवानगी न घेता निदर्शने, आंदोलने, मोर्चा आयोजित करून, चिथावणी देणारी भाषणे, घोषणांद्वारे शांततेचा भंग करून शैक्षणिक वातावरण बाधित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या कामात व्यत्यय निर्माण होऊन अनेकदा भांडणे, मारामारी झाल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पूरक असे सौहार्दपूर्ण, शांततामय वातावरणाची आवश्यकता असल्याने विद्यापीठ आणि सभोवतालच्या शंभर मीटर परिसरात निर्बंध घालणे जरुरीचे असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. फौजदारी संहिता प्रक्रिया १९७३च्या कलम १४४ नुसार विद्यापीठ आणि सभोवतालच्या शंभर मीटर परिसरात विद्यार्थ्यांशिवाय इतर व्यक्तींना एकत्र येण्यास, विद्यापीठात प्रवेश करण्यास प्रतिबंध, विद्यापीठ परिसरात दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे.

# श्री गणेश सहकारी बँक निवडणूक बिनविरोध!

## » शंकर जगताप यांचे लोकनेते लक्ष्मण जगताप यांच्या पावलावर पाऊल!

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**श्री गणेश सहकारी बँक ही लोकसेवेचा वसा घेतलेली बँक असून, बँकेच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील घटकांना याचा मोठा फायदा झाला आहे. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप हे बँकेचे संस्थापक - संचालक होते. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाने या बँकेच्या माध्यमातून अनेकांचे व्यवसाय उभे राहिले आहेत. आपल्या ग्राहकांना वेगवान सेवा देण्यासाठी बँक कटिबद्ध असून, आगामी काळात बँकेचा व्यवसाय वृद्धीसाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, अशा भावना श्री गणेश सहकारी बँकेचे नवनिर्वाचित संचालक शंकर जगताप यांनी केले.**




> “ लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गणेश सहकारी बँक आजही आपली नियमित प्रगती करत आहे. यामुळे बँकेवर तिच्या ग्राहकांचा विश्वास दिवसेंदिवस वाढताना दिसून येत आहे. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्यावर व बँकेवर ज्या पद्धतीने सभासदांनी व खातेदारांनी विश्वास ठेवला, तोच विश्वास आणि बँकेची नियमित प्रगती साधण्यासाठी आम्ही सर्व नवनिर्वाचित संचालक कटिबद्ध आहोत.
>
> **- शंकर जगताप,**
> नवनिर्वाचित संचालक. श्री गणेश सहकारी बँक मर्या., पिंपळे गुरव.

सहकार क्षेत्राच्या माध्यमातून विकास करता येवू शकतो, हे समजून लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांनी पिंपळे गुरव येथे सन १९९८ साली बँकेची स्थापना केली. बँकेच्या माध्यमातून मिळणाऱ्या तत्पर सेवा, बँकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या आकर्षक कर्ज योजना, ठेव योजना यामुळे बँकेकडे ग्राहकांचा ओघ सातत्याने वाढत आहे.

श्री गणेश सहकारी बँक मर्यादित या बँकेची पंचवार्षिक निवडणुकीचा सोमवारी अर्ज माघारीचा शेवटचा दिवस होता. त्यामध्ये सर्व १७ उमेदवार बिनविरोध निवडून (सन २०२३-२०२८) आले. या निवडलेल्या संचालक मंडळातून बँकेच्या अध्यक्ष व इतर पदाधिकारी निवडले जाणार आहेत. शंकर जगताप यांनी लोकनेते लक्ष्मण जगताप यांच्या पावलावर पाऊल टाकत बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याची परंपरा कायम ठेवली. या बद्दल खातेदार, सभासदांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. या निवडणुकीत निवडणूक अधिकारी म्हणून नागनाथ केंजेरी यांनी कामकाज पाहिले.

### नवनिर्वाचित संचालक मंडळ पुढीलप्रमाणे

» संचालक सदस्य – सर्वसाधारण गट : शंकर पांडुरंग जगताप, संजय गणपत जगताप, दत्तात्रय गोविंद चौघुले, शशिकांत गणपत कदम, उद्धव मुरार पटेल, अंकुश रामचंद्र जवळकर, संतोष सखाराम देवकर, शिवलिंग बसवंतप्पा किणगे, मधुकर सोपान रणपिसे, सुरेश तात्याबा शिंदे, शहाजी भगवानराव पाटील, प्रमोद नाना ठाकर महिला गट – राजश्री बिभीषण जाधव, शैला जनार्दन जगताप, राखीव गट (अ. जा. अ. ज) – अभय केशव नरडवेकर, राखीव गट (इ. मा. व.) - राजेंद्र शंकर राजापुरे, राखीव गट (भ. जा., वि. जा. वि. मा. प्र) – सुरेश शंकर तावरे.

### बँकेला बिनविरोध निवडणुकीची परंपरा

» बँकेची मागील निवडणूक सन २०१५ ते २०२० या कालावधीसाठी घेण्यात आली होती. या कालावधीमध्ये बँकेचे अध्यक्ष संजय जगताप होते. सन २०२० साली असलेल्या कोरोना काळामुळे निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती. सन १९९८ या साली बँकेची स्थापना झाली आहे. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांनी पुढाकार घेताना बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्या प्रथेला सुरुवात केली होती. आज मात्र, आमदार जगताप हयात नसताना त्यांचे बंधू शंकर जगताप यांनीदेखील हीच परंपरा कायम राखताना ही पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध केली.

# पिंपरीत ‘कमळ’ फुलवण्याची तयारी;

# महायुतीमध्ये मिठाचा खडा?

## भाजपा निवडणूक प्रमुख अमित गोरखे यांचे यांचे ‘जोरदार ब्रँडिंग’

## विद्यमान आमदार अण्णा बनसोडेंसह इच्छुकांची डोकेदुखी वाढणार







।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी विधानसभा मतदार संघातील भाजपाचे निवडणूक प्रमुख अमित गोरखे यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने जोरदार ‘ब्रँडिंग’ केले. त्यामुळे आगामी २०२४ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत गोरखे भाजपाकडून उमेदवारीवर ‘क्लेम’ करणार हे निश्चित मानले जात आहे. त्यामुळे महायुतीतील घटक पक्ष शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या इच्छुकांची अस्वस्थता वाढली आहे.**

भारतीय जनता पार्टीचा पिंपरी विधानसभेतील उच्चशिक्षीत आणि क्लिन चेहरा अशी अमित गोरखे यांची ओळख आहे. २०१४ मध्ये राज्यात भाजपा-सेना युतीचे सरकार स्थापन झाले. त्यानंतर अमित गोरखे यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळावर अध्यक्षपदी त्यांची वर्णी लागली होती. भाजपाचे ‘डिसिझन मेकर’ नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी गोरखे सलोख्याचे संबंध आहेत. २०१९ मध्ये महाविकास आघाडीच्या सत्ता स्थापन झाली. त्यानंतर अडीच वर्षे अमित गोरखे यांनी पिंपरी मतदार संघात पक्ष संघटनेसाठी काम केले. त्यानंतर शिंदे-फडणवीस सरकार स्थापन झाले. त्यावेळी गोरखे यांच्यावर पिंपरी विधानसभा प्रमुखपदाची जबाबदारी सोपवण्यात आली.

मतदार संघातील परंपरागत प्रतिस्पर्धी काँग्रेस आणि राष्ट्रवादीविरोधात त्यांनी भाजपाची ‘व्होट बँक’ जमवण्यासाठी पुढाकार घेतला. त्याला यशही मिळाले आहे. विशेष म्हणजे, २०१४ मध्ये राज्यात भाजपाची सत्ता आल्यानंतर पिंपरी विधानसभा मतदार संघात दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांनी एकत्रितपणे लक्ष घातले होते. या मतदार संघातून महापालिकेच्या १८ पैकी १२ जागा निवडून आल्या आहेत.

त्यामुळे भाजपाचे विद्यमान शहराध्यक्ष शंकर जगताप आणि आमदार महेश लांडगे यांच्या मदतीने अमित गोरखे यांना स्थानिक पातळीवर मोठी ताकद मिळणार असून, गोरखे आगामी विधानसभा निवडणुकीत ‘डार्क हॉर्स’ ठरणार आहेत.

### पिंपरी मतदार संघात पहिली ठिणगी...

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार आणि सहकाऱ्यांनी महायुतीमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी पिंपरी-चिंचवडमध्ये पिंपरी विधानसभा मतदार संघात पहिली ठिणगी पडली होती. अमित गोरखे यांच्या पुढाकाराने पिंपरी मतदार संघातील पदाधिकारी, कार्यकर्ते, भाजपा परिवारातील मान्यवरांची बैठक झाली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान बनवण्यासाठी पिंपरीत राष्ट्रवादीशी जुळवून घेवू, अशी भूमिका घेण्यात आली. मात्र, भाजपाच्या अनेक पदाधिकाऱ्यांना राष्ट्रवादीने सत्तेत सहभागी होणे पचनी पडलेले नाही. परिणामी, विद्यमान आमदार अण्णा बनसोडे आणि भाजपा यांच्यात दरी कायम आहे. याचा फटका महायुतीला बसणार आहे, अशी शक्यता राजकीय जाणकारांनी नोंदवली आहे.

### विधानसभा निवडणूक स्वबळावर?

**राज्यातील विधानसभा आणि महापालिका निवडणूक महायुतीचे घटकपक्ष अर्थात भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) स्वतंत्रपणे लढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पिंपरी विधानसभा मतदार संघातून अमित गोरखे ताकदीने कामाला लागले आहेत. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी, उच्चशिक्षीत आणि दांडगा जनसंपर्क अशा बलस्थानामुळे गोरखे पिंपरीत ‘कमळ’ फुलवू शकतात, असा त्यांच्या समर्थकांचा दावा आहे. विशेष म्हणजे, वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी गोरखे यांनी जोरदार ‘ब्रँडिंग’ केले आणि सर्वपक्षीय अनेक माजी नगरसेवक, आजी-माजी पदाधिकारी यांना निमंत्रित करण्यात आले. कार्यक्रमातील उपस्थितांची यादी पाहता गोरखे आगामी निवडणुकीत माघार घेणार नाहीत, असे चित्र आहे.**

---

# गायत्री इंग्लिश स्कूलचा दिवाळीनिमित्त ‘मूठभर धान्य’ उपक्रम

## विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याचा प्रयत्न; चिखली येथील विकास अनाथ आश्रमाला मदत

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**अनाथांची दिवाळी आनंददायी होण्याच्या उद्देशाने भोसरीतील गायत्री इंग्लिश मिडियम स्कूलच्या वतीने मूठभर धान्य उपक्रम राबविण्यात आला. यामधून जमा झालेले गहू, तांदुळ आणि साखर हे धान्य चिखली येथील विकास अनाथ आश्रमाला देण्यात आले. स्कूलमधील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी तसेच या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या (एसव्हीएसपीएम) ग्रायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमधील सर्व विद्यार्थ्यांनी यासाठी पुढाकार घेतला. यावेळी एसएससी सेक्शनच्या प्राचार्य बाळकृष्ण गोसावी, शिक्षक विनीता लोलयेकर, कोमल ढेरंगे, योगिता अमराळे, प्रिती व विलास खरे आदीसह आश्रमातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची तयारी अंकीता भुते यांनी केली. विलास अनाथ आश्रमचे संस्थापक व अध्यक्ष माऊली हरकळ यांनी दिलेल्या धान्याचा स्वीकार केला.

यामध्ये ४९० किलो तांदुळ, १०० किलो गहू, १५ किलो साखर प्रत्येकी देण्यात आली. स्कूलच्या या उपक्रमाचे आश्रमाच्या वतीने कौतूक करण्यात आले.

### नागरिकांचाही उपक्रमाला प्रतिसाद...

कुटुंबाचा आधार नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना कोवळ्या वयात आश्रमाचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामध्ये आपले शिक्षण पुर्ण करून नोकरी मिळविण्यापर्यंतचा विद्यार्थ्यांचा प्रवास होतो. त्यांना आधार देणाऱ्या संस्था देखील विद्यार्थ्यांच्या यशामध्ये मोठा हातभार लावत असतात. मात्र, या संस्था चालविण्यासाठी मोठ्या खर्चिक गोष्टींचा सामना करावा लागतो. त्यांना हातभार लावण्याच्या उद्देशाने तसेच स्कूलमधील विद्यार्थ्यांमध्येही सामाजिक बांधिलकी निर्माण होण्याच्या उद्देशाने गायत्री स्कूलच्या वतीने पुढाकार घेत मूठभर धान्य उपक्रम राबविला. धान्य देण्याबाबत सर्वांना आवाहन केले. नागरिकांनी देखील त्याला प्रतिसाद दिला.



“शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना वाढीस लागणे आवश्यक आहे. त्यासाठी सातत्याने विविध उपक्रमावर भर देतो. त्याचाच एक भाग म्हणून अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांना धान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी विद्यार्थ्यांनाच मूठभर धान्य उपक्रम राबविण्याच्या सूचना केल्या. विद्यार्थ्यांनी मोठ्या हिरहिरीने सहभाग घेतला.

- **विनायक भोंगाळे**, संस्थापक अध्यक्ष, एसव्हीएसपीएम, भोसरी.




# भरती रखडल्याने विश्वासार्हतेला ओहोटी

**राज्य सरकार अनेक वर्षांनंतर पदभरती करणार अशी आशा असताना या भरतीसाठी स्पर्धा परीक्षा आयोजित करण्याची जबाबदारी असलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) कामकाज रखडणे हा लाखो सुशिक्षित बेरोजगारांच्या जखमेवर मीठ चोळण्याचाच प्रकार आहे. या आयोगाच्या अध्यक्षांची मुदत १९ सप्टेंबरला संपुष्टात आल्यापासून कारभार हंगामी अध्यक्षांकडे सोपविण्यात आला.**



एक महिन्यापूर्वी राज्य शासनाने पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांची लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी निवड करण्याचा निर्णय घेतला व तसा आदेशही राज्यपालांनी काढला. पण सेठ हे अद्यापही पोलीस महासंचालकपदी कायम असून, ते लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाचा पदभार कधी स्वीकारणार याबाबत काहीच स्पष्टता नाही. अमृत महोत्सवानिमित्त राज्य शासनाने ७५ हजार पदांची भरती करण्याची केवढी प्रसिद्धी केली होती. लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे भरण्याकरिता शासनाच्या विविध विभागांनी मागणी नोंदविली आहे. स्पर्धा परीक्षा घेऊन त्यातील उत्तीर्ण परीक्षार्थीच्या मुलाखती घेण्याचे काम आयोगाचे असते. पण पूर्णवेळ अध्यक्ष नसल्याने व एका सदस्याचे पद अनेक महिने रिक्त असल्याने भरती प्रक्रियेवर परिणाम होत आहे. सप्टेंबरअखेर अध्यक्षपद रिक्त होणार याची पूर्वकल्पना असताना सरकारने वेळेत अध्यक्ष भरण्याची कार्यवाही का केली नाही वा नवीन अध्यक्ष नेमल्यावर त्यांना आधीच्या पदावरून लगेच पदमुक्त का केले नाही, असे प्रश्न यातून निर्माण होतात. पोलीस महासंचालकांची निवड करण्यासाठी ज्येष्ठ अधिकाऱ्यांच्या नावांची यादी केंद्रीय लोकसेवा आयोगाला पाठवावी लागते. त्यातून केंद्रीय लोकसेवा आयोग तीन नावे राज्य शासनाकडे पाठवितात. यापैकी एकाची पोलीस महासंचालकपदी नियुक्ती केली जाते. रजनीश सेठ यांची लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यापूर्वी राज्य सरकारने ही कार्यवाही केली नव्हती. यानंतर सरकारने ज्येष्ठ अधिकाऱ्यांची यादी सादर केली तेव्हा केंद्रीय लोकसेवा आयोगाने पोलीस महासंचालकांचे पद रिक्त का झाले, याची विचारणा सरकारला केली. त्यावर महाराष्ट्र सरकारने खुलासा पाठविला आहे. एकूणच लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांची नियुक्तीचा घोळ तसेच नवीन पोलीस महासंचालकांच्या निवडीस होत असलेला विलंब यास राज्य सरकारची अनास्थाच दिसते. लोकसेवा आयोगाला स्वायत्तता देऊन त्यावर विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नेमणे योग्य ठरेल. पण निवृत्त अधिकाऱ्यांची सोय लावण्याचे काही आयोग हे जणू काही अड्डेच तयार झाले आहेत. रजनीश सेठ हे डिसेंबरअखेर निवृत्त होणार असल्याने त्यांचे पुनर्वसन लोकसेवा आयोगावर करण्यात येत आहे. याआधी मनुकुमार श्रीवास्तव मुख्य सचिवपदावरून निवृत्त झाल्यावर त्यांचे पुनर्वसन सेवा हक्क समितीवर करण्यात आले. ही यादी लांबलचक आहे. राज्यकर्त्यांच्या पुढे पुढे करून निवृत्तीनंतर महत्त्वाच्या पदांवर स्वत:ची वर्णी लावून घेणाऱ्या अधिकाऱ्यांकडून सत्ताधाऱ्यांना सहसा दुखावले जात नाही. त्यांच्या कलानेच निर्णय घेतले जातात. हे दिल्लीपासून मुंबईपर्यंत सर्वत्र अनुभवास येते. लोकसेवा आयोगाचा पूर्वेतिहासही वादग्रस्तच आहे. स्पर्धा परीक्षांतील घोटाळ्यात आयोगाच्या एका माजी अध्यक्षांना तुरुंगात जावे लागले होते. शेजारील मध्य प्रदेशात 'व्यापम' घोटाळा असाच गाजला. मध्य प्रदेश सरकारच्या व्यावसायिक परीक्षा मंडळात (व्यापम) पैसे घेऊनच नोकरभरती करण्यात आल्याचा आरोप झाला होता. मध्य प्रदेश भाजप सरकारमधील माजी शिक्षणमंत्र्यांसह अनेकांना अटक झाली. त्यापेक्षा गंभीर म्हणजे घोटाळ्याशी संबंधित अनेकांचा संशयास्पदरीत्या मृत्यू झाला होता. एकीकडे बेरोजगारी वाढत असताना रोजगाराच्या संधी आटल्या आहेत. शिपायाच्या पदासाठी एमबीए वा पदव्युत्तर किंवा तलाठ्याच्या पदासाठी डॉक्टर व उच्चशिक्षित अर्ज करतात त्यावरून वास्तवाची जाणीव होते. अशा वेळी सरकारने लोकसेवा आयोगाला अधिक अधिकार देऊन भरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने करण्यावर भर देणे आवश्यक आहे. याशिवाय सदस्यांच्या संख्येत वाढ केल्यास मुलाखतींची प्रक्रियाही लवकर मार्गी लागू शकेल. सदस्यसंख्या वाढविण्याचे मागे सरकारने जाहीरही केले होते.

## संपादकीय »

# भूक निर्देशांक!

***यंदाच्या जानेवारीत सरकारतर्फे प्रसृत करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार या योजनेचा फायदा देशातील ८१.३५ कोटी गरिबांना झाला.***

पाच राज्यांतील निवडणुकांच्या धामधुमीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सध्या गरिबांसाठी सुरू असलेल्या मोफत धान्य योजनेस थेट पाच वर्षांची मुदतवाढ देण्याची घोषणा केली. पंतप्रधानांस रेवडी वाटप मंजूर नाही. ते स्वत: वारंवार या रेवडी वाटपावर टीकेचे आसूड ओढत असतात. पण ही घोषणा पंतप्रधानांनीच केलेली असल्याने ती रेवडी या व्याख्येत बसत नाही, असे गृहीत धरण्यास हरकत नाही. ही रेवडी नाही हे एकदा नक्की झाले की त्याची चव, गुणावगुण याबाबत चर्चा करणे सोपे. करोनाकाळात गरिबांच्या हातांस काम नाही आणि पोटांत अन्न नाही अशी अवस्था असताना त्यांची उपासमार टाळण्याच्या उदात्त हेतूने केंद्र सरकारने गरिबांसाठी धान्यवाटपाचा कार्यक्रम हाती घेतला. 'प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना' हे याचे नाव. तीन वर्षांपूर्वी २६ मार्च २०२० या दिवशी त्याची पहिली घोषणा झाली.

**फडणवीस यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात मराठा समाजासाठी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या. या समाजाला न्यायालयात टिकू शकेल, असे आरक्षण दिले, मात्र महाविकास आघाडी सरकारने यातील बहुतेक योजना बंद केल्या.न्यायालयात योग्य प्रकारे बाजू न मांडल्यामुळे मराठा समाजाला हाताशी आलेले आरक्षणही गमवावे लागले..**

# फडणवीसच मराठ्यांचे तारणहार!




मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा केंद्रस्थानी आला आहे. या विषयाच्या निमित्ताने माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विखारी भाषेत पुन्हा टीका सुरू झाली आहे. विरोधकांना जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी फडणवीस हा एकमेव नेता दिसत असल्याने त्यांना या ना त्या मार्गाने टीकेचे लक्ष्य करण्यासाठी अनेक जण आसुसलेले असतात. २०१४ पर्यंत राज्यात सत्ताकारणाची, अर्थकारणाची सूत्रे निवडक हितसंबंधितांच्या हाती एकवटली होती. ही सूत्रे २०१४ नंतर फडणवीसांनी विस्कटून टाकली.

२०१४ ते २०१९ या काळात फडणवीस यांनी अनेक प्रस्थापितांच्या वर्षानुवर्षांच्या हितसंबंधांची एकसामायिक समीकरणे उद्ध्वस्त केली. महाराष्ट्राच्या राजकारणात 'फडणवीसांचे नाणे' चालणार नाही, अशी खात्री अनेकांना होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राच्या भविष्यातील विकासचित्र साकारण्यासाठी फडणवीस यांच्यावर मोठ्या विश्वासाने मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सोपविली होती. हा विश्वास सार्थ ठरवताना फडणवीस यांनी अनेक शहरांत मेट्रो, समृद्धी महामार्ग, जलयुक्त शिवार, मराठवाडा वॉटर ग्रिड यांसारख्या अनेक योजनांद्वारे महाराष्ट्राचे उज्ज्वल भवितव्य घडविणार असल्याची ग्वाही दिली होती. त्यामुळेच मुख्यमंत्रीपदाच्या पाच वर्षांच्या कार्यकाळात त्यांना हरतऱ्हेने अडचणीत आणण्याचे उद्योग काही शक्तींनी केले. या सर्व प्रयत्नांना फडणवीस पुरून उरले होते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्राच्या जनतेने फडणवीस हेच पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत, असा स्पष्ट कौल मतपेटीद्वारे दिला होता. निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी आपली अनेक वर्षांची मुख्यमंत्रीपदाची महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी फडणवीस आणि भारतीय जनता पक्षाचा विश्वासघात केला. त्या वेळी उद्धव ठाकरे यांना विश्वासघात करण्यासाठी उद्युक्त करणाऱ्या काँग्रेस-राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेते मंडळींना कोणत्याही परिस्थितीत फडणवीस हे मुख्यमंत्री होऊ नयेत, असे वाटत होते. त्यासाठी शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने काँग्रेस नेतृत्वाचे मन वळविले आणि उद्धव ठाकरे यांना पाठिंबा देण्यास भाग पाडले. शरद पवार यांचे हे कारस्थान जून २०२२ मध्ये फडणवीस यांनी उधळून लावले. फडणवीस राजकारणाच्या पटावर भल्या-भल्यांना नमवत पुढे चालले असल्याने त्यांच्या बदनामीचे, त्यांना राजकारणातून उठवण्याचे प्रयत्न अत्यंत खालच्या स्तरावर जाऊन नव्या दमाने होऊ लागले आहेत.

## || अभंगवाणी ||



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ओबीसीचे आमच्याविरोधात षडयंत्र!

## मनोज जरांगे पाटील यांचा आरोप आणि इशारा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आंदोलक आणि बांधव सगळे शांतच आहेत. तरीही त्यांच्याविरोधात जाणीवपूर्वक षडयंत्र रचलं जातं आहे असं दिसतं आहे. विनाकारण खोट्या केसेसमध्ये गुंतवलं जातं आहे. या सगळ्याकडे सर्वपक्षीय मराठा नेत्यांनी लक्ष दिलं पाहिजे हे कुणी विसरु नये असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.**



मला एक माहिती मिळाली ती जर खोटी असेल तर मी माझे शब्द मागे घेईन पण मला भेटायला बीडचे काही लोक इथे आले होते. त्यांनी असं सांगितलं की छगन भुजबळ यांच्या पाहुण्यांचं जे काही हॉटेल काय फोडलं ते त्यांच्याच पोरांनी फोडलं आहे. मी आधीही म्हटलं होतं की सत्ताधाऱ्यांचेच लोक आमच्या आंदोलनाला गालबोट लावण्याचा प्रयत्न करत आहेत हे आता तंतोतंत खरं होताना दिसतं आहे. माझ्याकडे असलेली माहिती ऐकीव आहे पण मी जे बोलतो आहे ते सत्य असेल असं मला वाटतं आहे. मराठ्यांना फोडाफोडी आणि जाळपोळीशी घेणंदेणं नाही. मराठे फक्त स्वतःच्या लेकराला न्याय मिळावा म्हणून उभे आहेत. गोरगरीबांच्या पोरांवर खोट्या केसेस करुन, ओबीसींचे नेते बीडला जाऊन विनाकारण जात संपली पाहिजे, पोरं मोठी नाही झाली पाहिजेत यासाठी ताकदीने प्रयत्न करत आहेत. मला अशीही माहिती मिळाली की ते पोलीस अधीक्षकांजवळही जाऊन बसले होते. त्यांनी काही नावं लिहून दिली असंही समजतं आहे. आमची काही काही पोरं अशी आहेत जी कुणाच्याही उद्रेकात किंवा कशातच नाहीत. साखळी उपोषण करणारे, शांततेत आंदोलन करणारे तरुण यांना गोवलं जातं आहे. मी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनाही सांगू इच्छितो की हे आमच्याविरोधात षडयंत्र आहे. पुढे कारण आमच्याशीच गाठ आहे. आमच्यावर कितीही खोटे गुन्हे दाखल करा आम्ही मागे हटणार नाही. जे काही षडयंत्र चाललं आहे त्याकडे सरकारने लक्ष देणं आवश्यक आहे. मराठ्यांच्या मुलांना जाणीवपूर्वक गुंतवलं जातं आहे. मात्र सामान्य मराठा तरुणांना अडकवून बदनाम करण्यासाठी ओबीसींचे काही नेते प्रयत्न करत आहेत. निष्पाप आंदोलकांना अडकवण्याचा प्रयत्न हाणून पाडला पाहिजे असं माझं सरकारला आणि सर्वपक्षीय मराठा नेत्यांना आवाहन आहे. ओबीसी नेते आमच्याविरोधात षडयंत्र करत आहेत. मात्र आम्ही षडयंत्रांना घाबरत नाही. जे काही चाललं आहे विनाकारण चाललं आहे. जर सरकार आणि सर्वपक्षीय नेत्यांनी हे थांबवलं नाही तर आम्ही पुढे काय करायचं त्यासाठी समर्थ आहोत असंही जरांगे पाटील म्हणाले आहेत. आम्हीही मागे हटणार नाही. आम्हीही ५४ टक्के आहोत हे कुणीही विसरु नये. बीडमधल्या पोलिसांवर दबाव आणला जातो आहे. शांततेत आंदोलन करणाऱ्या मुलांना गुंतवणं सुरु आहे. आम्ही खोट्या गुन्ह्यांना घाबरत नाही तसंच केसेसना भीत नाही असंही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी केलेल्या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देणे म्हणजे मागील दाराने ओबीसीमध्ये प्रवेश देण्यासारखे आहे, असं विधान मंत्री छगन भुजबळ यांनी केलं होतं. यावरून छगन भुजबळांवर टीका केली जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही छगन भुजबळांना अप्रत्यक्षपणे सूचक इशारा दिला आहे. "कुणीही अन्य किंवा ओबीसी समाजात संभ्रम निर्माण करू नये," असं एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे. "ओबीसी समाजाला धक्का न लावता मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देण्याचा प्रयत्न सरकार करत आहे," असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. मुख्यमंत्री म्हणाले, "ओबीसी समाजाच्या बैठकीत देवेंद्र फडणवीस, अजित पवार उपस्थित होते.

### भुजबळांनी संभ्रम निर्माण करु नये

मंत्री शंभूराज देसाई यांनीही छगन भुजबळांना सुनावलं आहे. "ओबीसी समाजानं कुठेही गैरसमज करून घेण्याचा प्रयत्न करू नये. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कुठेही धक्का लावणार नाही. हे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं आहे. छगन भुजबळांनी अशाप्रकारची वक्तव्ये करून जाती-जातींतील लोकांमध्ये संभ्रम निर्माण करू नये," असं देसाईंनी म्हटलं आहे. "भडक वक्तव्य करण्याची सवय छगन भुजबळांना आहे. मुख्यमंत्र्यांनी राज्याची परिस्थिती व्यवस्थितपणे हाताळली आहे. सर्व प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहेत. अशातच भडक वक्तव्ये करून परिस्थिती भुजबळांनी परिस्थिती चिघळवू नये," असेही शंभूराज देसाईंनी म्हटलं.

# मराठा विरुद्ध ओबीसी लढाई लावायची का?

## सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यास आमचा विरोध : वडेट्टीवार

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रात मराठा आरक्षणाचा विषय चांगलाच चर्चेत आहे. याचं महत्त्वाचं कारण आहे ते म्हणजे मनोज जरांगे पाटील यांनी दोन वेळा केलेलं उपोषण. तसंच मराठा आरक्षणासाठी मराठा बांधवांचं सुरु असलेलं साखळी उपोषण आणि मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिलेली २४ डिसेंबरपर्यंतची मुदत.**



छगन भुजबळ यांनी बीडमध्ये सोमवारी पत्रकार परिषद घेऊन हे सांगितलं की आमचा मराठा आरक्षणाला विरोध नाही मात्र ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये. एकीकडे छगन भुजबळ यांनी ही भूमिका मांडली असताना राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही सरसकट कुणबी प्रमाणपत्राला आमचा विरोध आहे असं म्हटलं आहे. "आरक्षणाची टक्केवारी वाढवून मराठा समाजाला आरक्षण दिलं गेलं पाहिजे. सरसकट आरक्षण देण्यास आमचा आधीही विरोध होता आणि आत्ताही आहे. कुणबी नोंदणीचं काम शिंदे समितीला दिलं आहे. ओबीसींमध्ये समाविष्ट होणाऱ्या जाती त्यांनी शोधाव्या आणि श्वेतपत्रिका काढावी." असं विजय वडेट्टीवार म्हणाले. आम्ही राणे समिती स्थापन केली होती. त्यानंतर गायकवाड समिती आली. सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं आहे की कोणतीही जात मागास ठरवायची असेल तर त्यासाठीची प्रक्रिया आहे. ती राबवली गेली पाहिजे. जर सिद्ध झालं की ते मागास आहेत तर त्यांना आरक्षण द्यायला कुणाचीच ना नाही. छगन भुजबळ एक भूमिका मांडत आहेत आणि शंभूराज देसाई वेगळं बोलत आहेत. असं असू नये, लवकरात लवकर हा प्रश्न मार्गी लावावा असंही विजय वडेट्टीवार म्हणाले.

महाराष्ट्रातील कुणबींच्या नोंदी तपासण्यात येत आहेत. आता जी मागणी येते आहे की सरसकट मराठा समाजाला आरक्षण द्या. यावर सरकारची भूमिका काय? ते स्पष्ट झालं पाहिजे. मराठा विरुद्ध ओबीसी अशी लढाई यांना लावायची आहे का? असाही प्रश्न वडेट्टीवार यांनी विचारला आहे. मी ओबीसी आहे मला हेच वाटतं की ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये. सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यास माझा याआधीही विरोध होता आणि आत्ताही आहे. "शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या विदर्भात होतात. ते कोण आहेत? ते ओबीसी आहेत. का होतात? कारण ओबीसींमुळे सर्व काही मिळतं अशा पद्धतीचं वातावरण निर्माण केलं गेलं.

### ओबीसी समाजाला दुखवू नका

तुम्ही येणार तर वाढवून घ्या. वेगळा प्रवर्ग घ्या. तुम्ही ५० टक्केच्या आतमध्येची मागणी करताय. हा निर्णय सरकारने जाहीर केलाय. मग वाढवून द्या. ओबीसी समाजाला दुखवू नका. मराठा समाजालाही दुखवू नका. गरीब मराठा समाजाला न्याय मिळावं अशी आमचीदेखील भूमिका आहे. सरकार सरकार म्हणून जी भूमिका मांडायला हवं ती मांडताना दिसत नाही", अशी टीका वडेट्टीवार यांनी यावेळी केली.

# बिहारमध्ये 65 टक्के आरक्षण!

## मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा मोठा निर्णय

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी जात सर्वेक्षण करून राजकारणाचा एक नवा पायंडा पाडला. आज त्यांनी विधानसभेत राज्यातील आरक्षणाची मर्यादा वाढविण्याची इच्छा बोलून दाखविली आणि त्यानंतर झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आरक्षण वाढविण्याच्या प्रस्तावाला मंजुरीदेखील दिली.**

आता ९ नोव्हेंबर रोजी सदर प्रस्ताव विधानसभेत मांडला जाणार आहे. राज्यातील इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती आणि जमाती आणि विशेष मागासवर्गीय प्रवर्गाचे आरक्षण वाढविणार असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी काही दिवसांपूर्वीच सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणासाठी घालून दिलेल्या ५० टक्के मर्यादेच्या पुढे जाऊन आरक्षण वाढविण्याचा विचार मांडला होता. त्यानंतर आज मंत्रिमंडळानेही यावर शिक्कामोर्तब केले आहे. नुकत्याच जाहीर केलेल्या जातनिहाय सर्वेक्षणानाचा अहवाल मांडल्यानंतर नितीश कुमार यांनी विधानसभेत आरक्षण वाढविण्याबद्दलचा विचार व्यक्त केला. केंद्र सरकारने आर्थिक मागास घटकांना (EWS) दिलेल्या १० टक्के आरक्षणाला यामध्ये जोडले तर राज्यातील प्रस्तावित आरक्षणाची मर्यादा ७५ टक्क्यांवर पोहोचेल. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी जातनिहाय सर्वेक्षणाचा अहवाल विधानसभेत ठेवल्यानंतर त्यावर केलेल्या चर्चेत सांगितले की, इतर मागासवर्गीय वर्ग, अनुसूचित जाती आणि जमाती यांच्या आरक्षण मर्यादित वाढ करण्याची आवश्यकता आहे. आम्ही मंत्रिमंडळात चर्चा करून यावर काय करू शकतो, याचा निर्णय घेऊ. विद्यमान



अधिवेशनातच यावर निर्णय घेण्याचा प्रयत्न करू, असेही ते म्हणाले. सध्या, बिहार राज्य सरकारमधील नोकऱ्यांमध्ये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये ईबीसी प्रवर्गासाठी १८ टक्के आरक्षण आहे. तर ओबीसी प्रवर्गासाठी १२ टक्के आरक्षण आहे. अनुसूचित जातींसाठी १६ टक्के, अनुसूचित जमातीसाठी १ टक्का आणि मागासवर्गीय प्रवर्गातील महिलांसाठी ३ टक्के आरक्षण दिलेले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दोन दिवसांपूर्वी अमित शहा यांनी बिहार सरकारच्या जात सर्वेक्षणावर टीका केली होती. या सर्वेक्षणात मुस्लीम आणि यादव समाजाची लोकसंख्या वाढवून दाखविली असल्याचा आरोप त्यांनी केला होता. त्यानंतर जातनिहाय आरक्षणाच्या कोट्यात मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला. जातनिहाय सर्व्हेनुसार यादव समाजाची लोकसंख्या १४.२६ टक्के असल्याचे दिसले होते. ओबीसी प्रवर्गातील सर्वात मोठा जातसमूह म्हणून यादव समाजाकडे पाहिले जाते. लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दल (RJD) पक्षाचा यादव समाज हा प्रमुख मतदार आहे. आरजेडी पक्ष सध्या नितीश कुमार यांच्या महागठबंधन आघाडीत आहेत. इंडिया आघाडीतील पक्षांनी राष्ट्रीय स्तरावर जनगणना करण्याची मागणी केल्यामुळे आणि नितीश कुमार हे इंडिया आघाडीतील प्रमुख नेते असून त्यांनी जातनिहाय सर्व्हे केल्यामुळे अमित शाह यांनी त्यांच्यावर राजकीय तुष्टीकरणाचे आरोप लावले होते.

### छत्तीसगडमध्ये कारवाईची अपेक्षा

» मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी काही दिवसांपूर्वीच सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणासाठी घालून दिलेल्या ५० टक्के मर्यादेच्या पुढे जाऊन आरक्षण वाढविण्याचा विचार मांडला होता. त्यानंतर आज मंत्रिमंडळानेही यावर शिक्कामोर्तब केले आहे. नुकत्याच जाहीर केलेल्या जातनिहाय सर्वेक्षणानाचा अहवाल मांडल्यानंतर नितीश कुमार यांनी विधानसभेत आरक्षण वाढविण्याबद्दलचा विचार व्यक्त केला. केंद्र सरकारने आर्थिक मागास घटकांना (EWS) दिलेल्या १० टक्के आरक्षणाला यामध्ये जोडले तर राज्यातील प्रस्तावित आरक्षणाची मर्यादा ७५ टक्क्यांवर पोहोचेल. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी जातनिहाय सर्वेक्षणाचा अहवाल विधानसभेत ठेवल्यानंतर त्यावर केलेल्या चर्चेत सांगितले की, इतर मागासवर्गीय वर्ग, अनुसूचित जाती आणि जमाती यांच्या आरक्षण मर्यादित वाढ करण्याची आवश्यकता आहे. आम्ही मंत्रिमंडळात चर्चा करून यावर काय करू शकतो, याचा निर्णय घेऊ. विद्यमान अधिवेशनातच यावर निर्णय घेण्याचा प्रयत्न करू, असेही ते म्हणाले.

# सर्व राज्यांमध्ये 'या' फटाक्यांवर बंदी!

## सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निर्देश

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सर्वोच्च न्यायालयाने बेरियम आणि प्रतिबंधित रसायनांपासून तयार करण्यात आलेल्या फटाक्यांवर बंदी घातली आहे. तसंच हेदेखील स्पष्ट केलं आहे की याविषयीचे निर्देश फक्त दिल्लीच नाही तर प्रत्येक राज्यासाठी लागू आहेत. एका याचिकेच्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने हे निर्देश लागू केले आहेत. बेरियमचा वापर होत असलेल्या फटाक्यांमुळे प्रदूषण वाढतं त्यामुळे या फटाक्यांवर आणि प्रतिबंधिक रसायनांचा ज्या फटाक्यांमध्ये वापर होतो त्या फटाक्यांविषयी हे निर्देश देण्यात आले आहे. तसंच हे निर्देश दिल्लीसाठी नाही तर सगळ्या राज्यांना बंधनकारक आहेत असंही न्यायालयाने म्हटलं आहे.**



### वायू आणि ध्वनी प्रदूषण कमी व्हावं

» आम्ही आत्ता कुठलाही विशेष आदेश देत नाही. मात्र या प्रकरणासंदर्भात न्यायालयाने जे आदेश दिले आहेत त्यात हे स्पष्ट केलं आहे की वायू आणि ध्वनी प्रदूषण कमी व्हावं. त्यासाठी जी पावलं उचलायची आहेत ती उचलली गेली पाहिजेत. त्यामुळे राजस्थानच किंवा दिल्लीच नाही तर सगळ्या राज्यांनी या आदेशाचं पालन करावं.

२०२१ च्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले होते की दिवाळीच्या आधी जे फटाके तयार केले जातात त्यात बेरियम किंवा कुठल्याही प्रतिबंधित रसायनांचा वापर केला जाऊ नये. फटाक्यांवर संपूर्ण बंदी घालण्यात आलेली नाही पण ज्या फटाक्यांमध्ये बेरियमचा वापर आहे त्या फटाक्यांवर बंदी घालण्यात आली आहे. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने जे निर्देश दिले होते त्यानुसार पर्यावरणपूरक फटाके पेटवण्यास, उडवण्यास संमती आहे. जस्टिस एम आर शाह आणि जस्टिस बोपन्ना यांच्या खंडपीठाने २०२१ मध्ये हे स्पष्ट केलं होतं की जर देशाच्या कुठल्याही राज्याच्या कुठल्याही भागात बेरियम किंवा प्रतिबंधित फटाके यांचं उत्पादन आणि विक्री तसंच खरेदी करुन त्यांचा उपयोग केला गेला तर त्यासाठी राज्याचे मुख्य सचिव, पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक तसंच संबंधित पोलीस स्टेशन यांना जबाबदार ठरवलं जाईल. LIVELAW ने याबाबतचं वृत्त दिलं आहे. याच वर्षी सर्वोच्च न्यायालयात हरित फटाक्यांमध्ये वेगळा फॉर्म्युला वापरुन बेरियम समाविष्ट करण्यात यावं यासाठी फटाके निर्मात्यांची संघटना TANFAMA यांनी एक याचिका दाखल केली होती. मात्र न्यायालयाने ही याचिका फेटाळली.

# काँग्रेसचा विजय झालेल्या मतदारसंघात मायावतींची सभा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

बहुजन समाज पक्षाच्या अध्यक्ष मायावती यांनी मध्य प्रदेशमध्ये होत असलेल्या निवडणुकांची जोरदार तयारी सुरू केली आहे. काँग्रेसने ओबीसी समाजाची मते मिळविण्यासाठी जातनिहाय जनगणनेचे फसवे आश्वासन दिले असल्याची टीका मायावती यांनी सोमवारी काँग्रेसवर केली. मध्य प्रदेशमधील २३० विधानसभेच्या मतदारसंघासाठी १७ नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे.

यापैकी १८३ मतदारसंघांमध्ये मायावती यांचा बसपा पक्ष गोंडवाना गणतंत्र पक्षासह (GGP) निवडणूक लढविणार आहे, तर उर्वरीत ४७ जागांवर जीजीपी पक्ष निवडणूक लढविणार आहे. अशोक नगर जिल्ह्यातील मुंगावली येथील जाहीर सभेत भाषण करत असताना मायावती यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. १९५३ साली मागासवर्गीय समाजासाठी पहिल्यांदाच आयोग स्थापन करण्यात आला होता. काका कालेलकर आयोगाने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासावर्गीय असलेल्या समाजाचा अहवाल देऊन काही शिफारसी केल्या होत्या. पण, काँग्रेसने या शिफारसींची अंमलबजावणी केली नाही. तसेच मंडल आयोग या दुसऱ्या आयोगाने ओबीसी समाजाला सर्व स्तरात २७ टक्के आरक्षण देण्याची भूमिका मांडली होती. पण, मंडल आयोगाचीही पूर्णपणे अंमलबजावणी झालेली नाही.

त्यामुळे ओबीसी मतदारांनी काँग्रेसच्या भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन मायावती यांनी केले. २०१८ च्या विधानसभा निवडणुकीत मुंगावली मतदारसंघात बसपाच्या उमेदवाराला १४,२०२ मते मिळाली आणि त्याला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. या मतदारसंघात काँग्रेसने २,१३६ एवढ्या कमी मताधिक्याने भाजपाचा पराभव केला होता.

# रश्मिकानंतर कतरिनाचा डीपफेक फोटो!

दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदानाचा मार्फ व्हिडीओ व्हायरल झाल्यावर सिनेविश्वात एकच खळबळ उडाली. महानायक अमिताभ बच्चन यांच्यासह अनेक कलाकार व चाहत्यांनी या प्रकरणी नाराजी व्यक्त केली. या घटनेला एक दिवस उलटत नाही तोपर्यंत बॉलीवूड अभिनेत्री कतरिना कैफचाही डीपफेक फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्याची माहिती समोर आली आहे. कतरिना कैफ लवकरच 'टायगर ३' चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटातील एका सीनमध्ये कतरिनाने टॉवेल गुंडाळून फायटिंग केला आहे. कतरिनाचा हा टॉवेल सीन ट्रेलर प्रदर्शित झाल्यावर सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता. ट्रेलरमधील कतरिनाच्या मूळ फोटोशी छेडछाड करत यात बदल करण्यात आला आहे. एका युजरने एक्सवर (ट्विटर) कतरिनाचा हा आक्षेपार्ह फोटो शेअर केला होता. हा डीफफेक फोटो आता सगळ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरून हटवण्यात आला आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून अभिनेत्रीच्या मूळ फोटोमध्ये मोठ्या प्रमाणात छेडछाड करण्यात आली होती. रश्मिका पाठोपाठ कतरिना कैफचा डीपफेक फोटो व्हायरल झाल्याने अनेकांकडून या नव्या तंत्रज्ञानाबद्दल चिंता व्यक्त करण्यात येत आहे. कतरिनाच्या आधी सोमवारी रश्मिका मंदानाचा डीपफेक व्हिडिओ व्हायरल झाला होता. या डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून फोटो किंवा आवाजाची हुबेहूब नक्कल करणारे व्हिडीओ तयार करण्यात येतात. गेल्या काही महिन्यांपासून याचा मोठ्या प्रमाणात गैरवापर होऊ लागला आहे.

कतरिनाचे डीपफेक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यावर



नेटकऱ्यांनी कमेंट सेक्शनमध्ये संतप्त प्रतिक्रिया दिल्या आहेत. तिच्या अनेक चाहत्यांनी सायबर क्राईमकडून यावर कठोर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी देखील केली आहे.

# सनी करणार 'ग्लॅम फेम' या शोचं परिक्षण

बॉलिवूड अभिनेत्री सनी लिओनी आता अजून एक भूमिका बजावण्यासाठी सज्ज झाली असून ती एका नवीन भूमिकेत पाऊल ठेवणार आहे. मॉडेल्सना प्रेरणा देणाऱ्या आगामी रिॲलिटी शो 'ग्लॅम फेम' मध्ये ती जज बनणार असून ती नवी भूमिका बजावणार आहे. सनी लिओनीला जज होण्याबद्दल विचारले असता म्हणाली की, 'मॉडेलला प्रेरणा देऊन त्यांना त्यांच्या करिअरमध्ये पुढे जाण्यासाठी नक्कीच आम्ही मदत करणार आहोत. या शोमधून पुढच्या पिढीच्या महत्त्वाकांक्षी मॉडेल्सना मार्गदर्शन करण्याची अनोखी जवाबदारी माझ्यावर आहे, आणि यासाठी मी उत्सुक आहे. माझा विश्वास आहे की, मॉडेलने सध्याचा ट्रेंड समजून घेतला पाहिजे आणि हे व्यासपीठ प्रतिभावान तरुणांना स्फूर्ती देणार आहे या शोमध्ये अभिनेता नील नितीन मुकेश आणि ईशा गुप्ता यांच्यासमवेत सनी लिओनी एका प्रतिष्ठित जजिंग पॅनेलचा भाग असणार आहे. 'ग्लॅम फेम' शोत रोहित खंडेलवाल, संतोषी शेट्टी, दिनेश शेट्टी आणि प्रसिद्ध फॅशन आणि लाइफ स्टाईल फोटोग्राफर डब्बू रतनानी यांसारखे मार्गदर्शकांचा भाग असणार आहे. व्हॉटवर प्रॉडक्शन आणि कृष्णा कुंज प्रॉडक्शनची सहनिर्मिती असलेला 'ग्लॅम फेम' लवकरच प्रदर्शित होणार आहे. हा शो महत्त्वाकांक्षी मॉडेल्सना तज्ज्ञांकडून शिकण्याची आणि स्वतःचे मार्ग तयार करण्याची संधी देऊन मॉडेलिंग उद्योगात बदल घडवून आणेल असे सनीने सांगितले आहे. सनी लिओनीच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाल्यास अनुराग कश्यपच्या निओ-नॉयर थ्रिलर



# 'सॅम बहादुर'चा जबरदस्त ट्रेलर!

विकी कौशल आणि मेघना गुलजार यांचा बहुचर्चित 'सॅम बहादुर' हा चित्रपट गेल्या काही दिवसांपासून चांगलाच चर्चेत आहे. टीझर आणि पोस्टरनंतर आता नुकतंच या चित्रपटाचा ट्रेलरही प्रदर्शित करण्यात आला आहे. सोशल मीडियावर याला जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. प्रेक्षक या चित्रपटाच्या ट्रेलरची आतुरतेने वाट बघत होते. भारताचे पहिले फील्ड मार्शल सॅम माणेकशा यांच्या जीवनावर हा चित्रपट बेतलेला आहे . ट्रेलरमध्ये विकी कौशलने देहबोली, संवादफेक, फील्ड मार्शलच्या भूमिकेसाठीचा ॲटीट्यूड यावर प्रचंड मेहनत घेतल्याचं जाणवत आहे. सॅम माणेकशा यांच्या हालचालीपासून बोलण्याची लकब अगदी हुबेहूब विकीने पकडली आहे. विकीच्या करिअरमधील ही सर्वात आव्हानात्मक भूमिका आहे. हा ट्रेलर पाहून प्रेक्षकांनी विकीने घेतलेल्या मेहनतीची प्रशंसा करायलाही सुरुवात केली आहे. या चित्रपटात सॅम माणेकशा यांचा भारतीय सैन्यातील एकूण प्रवास, त्यांची शिस्त, त्यांची देशभक्ती, १९७१ च्या दरम्यान भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान त्यांची कामगिरी अशा वेगवेगळ्या पैलूंचा उलगडा या चित्रपटातून होणार आहे ते ट्रेलर पाहताना जाणवतं. याबरोबरच चित्रपटात सॅम यांचे खासगी कौटुंबिक आयुष्य, राजकीय नेत्यांशी त्यांचे असलेले मतभेद व त्यामुळे त्यांना झालेला त्रास या सगळ्यावरही चित्रपट भाष्य केलं असल्याचं ट्रेलरमध्ये स्पष्ट होत आहे. या चित्रपटात सॅम माणेकशा यांच्या जीवनातील वेगवेगळ्या पैलूंवर भाष्य करण्यात आलं असून तत्कालीन राजकीय परिस्थितिचंही अचूक चित्रण यात करण्यात आल्याचं ट्रेलरवरुन दिसत आहे. मेघना गुलजार हिने या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे.

# डॉन 3'मध्ये पुन्हा झळकणार प्रियांका!

फरहान अख्तरने 'डॉन ३'ची घोषणा केल्यानंतर सगळेच फार उत्सुक झाले होते. चाहत्यांची ही उत्सुकता मात्र एका क्षणात रागात बदलली जेव्हा या तिसऱ्या भागात मुख्य भूमिकेसाठी रणवीर सिंहला घेतल्याचं स्पष्ट झालं. प्रेक्षकांना या भूमिकेसाठी रणवीरची निवड अजिबात पटलेली नसून त्यांनी यावर टीकादेखील केली. आता या चित्रपटाशी निगडीत एक नवी अपडेट समोर येत आहे. 'डॉन'ची जंगली बिल्ली म्हणजेच प्रियांका चोप्रा या तिसऱ्या चित्रपटाशी जोडली जाणार असल्याची शक्यता आहे. 'कोईमोई'च्या रिपोर्टनुसार, 'जी ले जरा' या चित्रपटाच्या कलाकारांची निवड अद्याप झाली नसल्यामुळे, फरहान अख्तर 'डॉन ३'कडे प्रथम लक्ष देणार असल्याचं समोर आलं आहे. लवकरच प्रियांका चोप्रा आणि रणवीर सिंगबरोबर फरहान 'डॉन ३' च्या चित्रीकरणाला सुरुवात करणार आहे. रिपोर्टनुसार, प्रियांकाने नुकतीच फरहान अख्तरची भेट घेतली असून त्यांनी 'डॉन ३'विषयी काही गोष्टींवर चर्चाही केली आहे. याआधीच्या दोन्ही डॉनमध्ये प्रियांका रोमाच्या भूमिकेत दिसली होती. 'डॉन ३' साठी याआधी क्रीती सेनॉन व कियाराय आडवाणी यांनाही विचारण्यात आलं होतं. परंतु या दोघींनीही ही ऑफर नाकारल्याने अखेर फरहानने प्रियांकालाच घ्यायचं ठरवलं. अद्याप याबद्दल अधिकृत घोषणा झालेली नसली तरी प्रियांका या चित्रपटात झळकणार हे नक्की झालं आहे. प्रियांका चोप्राने यापूर्वी रणवीर सिंगबरोबर 'गुंडे', 'बाजीराव मस्तानी' आणि 'दिल धडकने दो' या चित्रपटात काम केले होते.



# त्रिधा अडकणार लग्नबंधनात!

प्रसिद्ध चित्रपट निर्माते प्रकाश झा यांच्या 'आश्रम' या वेबसीरिजमधून अभिनेत्री त्रिधा चौधरी प्रकाश झोतात आली. त्रिधा चौधरी हा बंगाली, तेलगु सिनेसृष्टीतील एक नावाजलेला चेहरा आहे. बंगाली, तेलगु चित्रपटांच्या बरोबरीने त्रिधाने मालिका तसेच 'स्पॉटलाइट', 'बंदिश बँडिट्स' या वेबसीरिजमध्ये काम केले आहे. 'आश्रम' वेबसीरिजमधील ही बबीता सध्या एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे . लवकरच बबिता म्हणजेच त्रिधा चौधरी ही लग्नबंधनात अडकणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. खुद्द त्रिधानेच या गोष्टीची पुष्टी केली आहे. आपल्या बोल्डनेसमुळे कायम चर्चेत असणाऱ्या त्रिधाने लवकरच लग्न करणार असल्याचं स्पष्ट केल्याने तिच्या चाहत्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. एका मुलाखतीदरम्यान त्रिधाने याबद्दल खुलासा केला आहे. कलकत्ता टाइम्सला दिलेल्या मुलाखतीमध्ये तिने याबद्दल खुलासा केला आहे. त्रिधा पुढील वर्षी लग्न करणार असून तिचा होणारा नवरा, तिचा जोडीदारदेखील याच क्षेत्रातील असल्याचेही संकेत तिने दिले आहेत. आता त्रिधाच्या चाहत्यांना तिचा नेमका जोडीदार आहे तरी कोण हे जाणून घेण्याची उत्सुकता लागून राहिली आहे. यामुळे बरेच चाहते सोशल मीडियावर त्रिधाकडे तिच्या होणाऱ्या नवऱ्याचे नाव जाहीर करण्याची विनंती करतानाही दिसत आहेत.

# एकच वादा मॅक्सवेल दादा!

## मॅक्सवेलने अफगाणिस्तानच्या तोंडचा घास हिरावला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**ग्लेन मॅक्सवेलच्या झंझावाती द्विशतकाच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने अफगाणिस्तानविरुद्ध थरारक विजयाची नोंद केली. अफगाण संघाने पहिला फलंदाजी करत 50 षटकांत गडी गमावून 291 धावांपर्यंत मजल मारली होती. त्यानंतर 292 धावांच्या विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना कांगारूंची अवस्था 18.3 षटकांत 7 बाद 91 अशी झाली होती. पण या पडझडीत मॅक्सवेलने संघासाठी झुंझार आणि अविश्वसनीय खेळी साकारून अफगाणिस्तानच्या तोंडचा घास हिरावला.**

या खेळीदरम्यान मॅक्सवेल जबर जखमी झाला होता. त्याच्या पाठीत आणि मांडीत वेदना होत होत्या. पायांची हालचाल करता येत नव्हती. तो लंगडत धावत होता. पण तरीही एखाद्या लढवय्याप्रमाणे त्याने जागेवर उभा राहून चेंडू सीमापार धाडले. त्याने आपल्या स्फोटक खेळीदरम्यान 10 षटकार 21 चौकारांच्या मदतीने 128 चेंडूत नाबाद 202 धावा केल्या. ऑस्ट्रेलियाने 46.5 षटकांत 7 गड्यांच्या मोबदल्यात 293 धावा केल्या आणि सामना खिशात घातला. 292 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या कांगारू संघाची सुरुवात खराब झाली. संघाने 1.2 व्या षटकात अवघ्या 4 धावांवर ट्रॅव्हिस हेडची (0) विकेट गमावली. येथून मिचेल मार्श आणि डेव्हिड वॉर्नरने डावाची धुरा सांभाळली.

मार्श (24) वेगवान खेळत होता पण तोही सहाव्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर नवीन-उल-हकचा बळी ठरला. 9व्या षटकाच्या पहिल्या आणि दुसऱ्या चेंडूवर वेगवान गोलंदाज अजमतुल्ला उमरझाईने दोन कांगारू फलंदाजांची शिकार केली. यात डेव्हिड वॉर्नरला (18) क्लिन बोल्ड तर जोश इंग्लिसला (0) स्लिपमध्ये झेलबाद करण्यात त्याला यश आले. पॉवरप्ले-1 च्या 10 षटकात



ऑस्ट्रेलियाला 4 गडी गमावून केवळ 52 धावा करता आल्या. यानंतरही कांगारूंची पडझड सुरूच राहिली. 15 व्या षटकात 69 धावसंख्येवर कांगारूंची पाच विकेट पडली. मार्नस लॅबुशेन 28 चेंडूत 14 धावा करून बाद झाला. रहमत शाहच्या अचूक थ्रोने तो धावबाद झाला. यानंतर राशीद खानने दे धक्का देत ऑस्ट्रेलियाला आणखीन बॅकफुटवर ढकलले. त्याने त्याच्या लागोपाठ दोन षटकांत दोन बळी घेतले. त्याने 16.4 व्या षटकात मार्कस स्टॉइनिसला (6) विकेट्ससमोर पायचीत पकडले. तर 18.3 व्या षटकात मिचेल स्टार्कला (3) तंबूत पाठवले. यादरम्यान, एकाबाजूने विकेट पडत असताना मॅक्सवेलने ऑस्ट्रेलिया डाव सांभाळला. त्याने पॅट कमिन्सच्या साथीने 21 व्या षटकात संघाचे शतक धावफलकावर झळकावले.

तर 25.2 व्या षटकात स्वत:चे अर्धशतक 51 चेंडूत पूर्ण केले. इथून पुढे त्याने अफगाणी फिरकीपटूंचा समाचार घेतला आणि चौकार-षटकारांचा पाऊस पाडला. त्याने 32.2 व्या षटकात शतक झळकावले. त्याचे हे एकदिवसीय कारकिर्दीतील चौथे तर विश्वचषकातील तिसरे शतक ठरले. तर विश्वचषकात द्विशतक फटकावणार पहिला फलंदाज ठरला. मॅक्सवेलने यादरम्यान, त्याला कमिन्सने (68 चेंडूत 12 धावा) खांबीर साथ दिली. या जोडीने नाबाद 202 धावांची विजयी भागिदारी पूर्ण केली. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना 50 षटकांत 5 गडी गमावून 291 धावा केल्या. सलामीवीर रहमानुल्ला गुरबाज आणि इब्राहिम झादरान यांनी पहिल्या दोन षटकांमध्ये बचावात्मक पवित्रा अवलंबला. पण त्याचवेळी खराब चेंडूवर मोठे फटकेही मारले. पण 7व्या षटकात मॅक्सवेलने आपल्या फिरकीच्या जोरावर अफगाण फलंदाजांवर दडपण आणले. त्यानंतर पुढच्याच षटकात जोश हेजलवूडने गुरबाजची विकेट घेऊन सलामीची जोडी फोडली.

### विजयासह ऑस्ट्रेलियाचे 12 गुण

मॅक्सवेलला क्रॅम्पमुळे उभेही राहता येत नव्हते. पण तरीही त्याने धडाकेबाज फटकेबाजी केली आणि एकाहती सामना कसा जिंकवला जाऊ शकतो, याचा उत्तम वस्तुपाठ दाखवला. त्यामुळे अफगाणिस्तानच्या संघाने त्याच्यापुढे लोटांगण घातल्याचे पाहायला मिळाले. मॅक्सवेलला दुखापत झाली होती. पण एकाच जागेवर उभा राहून त्याने जी फटकेबाजी केली त्याला तोड नव्हती. त्यामुळे मॅक्सवेलचे कौतुक करावे तेवढे थोडे होते. कारण नवव्या क्रमांकाच खेळाडूला घेऊन तो खेळला आणि ऑस्ट्रेलियाला सामना जिंकवण्यात त्याने सिंहाचा वाटा उचलला. या विजयासह ऑस्ट्रेलियाचे १२ गुण झाले आहेत. त्यामुळे ऑस्ट्रेलियाच्या संघाने आता या वर्ल्ड कपच्या सेमी फायनलमध्ये आपले स्थान निश्चित केले आहे

# श्रीलंका क्रिकेट बोर्ड बरखास्त?

## हकालपट्टी केलेले अधिकारी पुन्हा कामावर

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज



**विश्वचषक स्पर्धेत भारताकडून झालेल्या मानहानीकारक पराभवानंतर श्रीलंकेचे क्रीडा मंत्री रोशन रणसिंघे यांनी सोमवारी (दि. 6) आपल्या देशाच्या क्रिकेट बोर्डच बरखास्त केले. या कारवाईनंतर बोर्डाचे अध्यक्ष शम्मी सिल्वा यांनी क्रीडामंत्र्यांच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका दाखल केली, जी न्यायालयाने सुनावणीसाठी स्वीकारली.**

मंगळवारी (दि.7) कोर्टाने या प्रकरणाची दखल घेत क्रीडा मंत्र्यांचा निर्णय रद्द केला आणि श्रीलंका क्रिकेट बोर्ड कायम राहिल हे स्पष्ट केले. तसेच संपूर्ण सुनावणी होईपर्यंत हकालपट्टी केलेल्या अधिकाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याचे निर्देश दिले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, श्रीलंकेच्या कोर्ट ऑफ अपीलने देशाच्या क्रिकेट बोर्डाला बरखास्त करण्याचा क्रीडामंत्र्यांचा निर्णय रद्द केला असून सुनावणी पूर्ण होईपर्यंत हकालपट्टी केलेल्या अधिकाऱ्यांना पुन्हा कामावर ठेवले आहे.

एका न्यायालयीन अधिकाऱ्याने सांगितले की, हा निर्णय दोन आठवड्यांसाठी आहे, त्यानंतर या प्रकरणाची पुन्हा सुनावणी होईल. भारताकडून 302 धावांनी झालेल्या नामुष्कीजनक पराभवानंतर श्रीलंकेच्या क्रीडामंत्र्यांनी श्रीलंका क्रिकेट बोर्ड बरखास्त केले होते. त्यानंतर सोमवारी रणसिंगे यांनी माजी कर्णधार अर्जुन रणतुंगा यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यांची अंतरिम समिती नेमली होती. त्यानंतर रणतुंगा म्हणाले होते की, 'श्रीलंका क्रिकेट बोर्ड ही देशातील सर्वात भ्रष्ट संस्था म्हणून ओळखली जाऊ लागली आहे आणि मला ती प्रतिमा बदलायची आहे.' पण कोर्टाने मंगळवारी क्रीडा मंत्र्यांचा निर्णय रद्द केला आणि विद्यमान बोर्ड दोन आठवड्यांसाठी कायम राहिल असे सांगितले. त्यामुळे 1996 मध्ये श्रीलंकेला विश्वचषक जिंकून देणाऱ्या रणतुंगा यांना एका दिवसात अध्यक्षपद गमवावे लागले.

श्रीलंका आठ सामन्यांत दोन विजयांसह 4 गुणांसह गुणतालिकेत सातव्या स्थानावर आहे. श्रीलंकेचा दक्षिण आफ्रिकेने 102 धावांनी, पाकिस्तानने 6 विकेट्सने, ऑस्ट्रेलियाने 5 विकेट्सने, अफगाणिस्तानने 7 विकेट्सने, भारताने 302 धावांनी आणि बांगलादेशने 3 विकेट्सने पराभव केला. श्रीलंकेने नेदरलँड्सचा 5 विकेट्सने तर इंग्लंडचा 8 गडी राखून पराभव केला होता.

# 'प्लेअर ऑफ द मंथ' साठी बुमराहला नामांकन!

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) 'प्लेअर ऑफ द मंथ' पुरस्कारासाठी निवडलेल्या तीन खेळाडूंची नावे मंगळवारी (7 नोव्हेंबर) जाहीर केली आहेत. यात एक वेगवान गोलंदाज, एक यष्टीरक्षक फलंदाज आणि एक अष्टपैलू खेळाडूचा समावेश आहे. या यादीत टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला स्थान मिळाले आहे.

जसप्रीत बुमराह व्यतिरिक्त ऑक्टोबर 2023 साठी निवडलेल्या खेळाडूंमध्ये दक्षिण आफ्रिकेचा यष्टीरक्षक फलंदाज क्विंटन डी कॉक आणि न्यूझीलंडचा अष्टपैलू रचिन रवींद्र यांचा समावेश आहे. या तिन्ही खेळाडूंनी 2023 च्या विश्वचषक स्पर्धेत आतापर्यंत अप्रतिम कामगिरी केली आहे. बुमराहने चेंडूने, डी कॉकने बॅटने आणि रवींद्रने बॅट-बॉलने कहर केला आहे. महिला खेळाडूंमध्ये वेस्ट इंडिजची हेली मॅथ्यूज, बांगलादेशची नाहिदा अक्तार आणि न्यूझीलंडची अमेलिया केर यांना नामांकन मिळाले आहे. क्विंटन डी कॉकने विश्वचषक सामन्यांमध्ये 3 शतके झळकावली. ऑक्टोबरमध्ये झालेल्या या सामन्यांमध्ये श्रीलंका, ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेशविरुद्ध शतके झळकावण्यात त्याला यश आले होते. बांगलादेशविरुद्ध त्याने सर्वाधिक 174 धावांची खेळी केली आहे. ऑक्टोबरमध्ये संघासाठी एकूण 431 धावा केल्या. यावेळी त्याची सरासरी 71.83 अशी राहिली आहे. तर याच महिन्यात त्याने यष्टिरक्षक म्हणून 10 झेल आणि एक स्टंपिंग केले. प्लेअर ऑफ द मंथसाठी डी कॉकचे जून 2021 नंतरचे हे पहिले नामांकन आहे.